महाराष्ट्र कृषि प्रशासकीय सेवा गट-ब (सहाय्यक प्रशासकीय अधिकारी) संवर्गातील अधिकाऱ्यांना महाराष्ट्र कृषि प्रशासकीय सेवा गट-अ (प्रशासकीय अधिकारी) संवर्गात पदोन्नती देण्याबाबत. (निवडसूची वर्ष २०२५-२६)

महाराष्ट्र शासन
कृषि विभाग
शासन आदेश क्रमांकः कृषिआ १०२६/प्र.क्र.५२/१६अे (ई-१४९३६२७)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार,मुंबई -३२.
दिनांक: २५ ऑगस्ट, २०२६

संदर्भ :- १) सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र. बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.०७ मे, २०२१
२) सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना दि.१४.०७.२०२१
३) कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र. जाक्र.कृआ/ पदोन्नती/प्रअ/आस्था-१/४६२/२०२६, दि.०८.०७.२०२६.

शासन आदेश :-

महाराष्ट्र कृषि प्रशासकीय सेवा गट-ब (सहाय्यक प्रशासकीय अधिकारी) (वेतनश्रेणी एस-१५ : रु.४१८००-१३२३००) संवर्गातील कर्मचाऱ्यांना निवडसूची वर्ष २०२५-२६ नुसार महाराष्ट्र कृषि प्रशासकीय सेवा गट-अ (प्रशासकीय अधिकारी) (वेतनश्रेणी एस-१८ : रु.४९१००-१५५८००) या संवर्गात पुढील अटींच्या अधीन राहून निव्वळ तात्पुरती पदोन्नती देऊन त्यांची स्तंभ-४ नुसार पदोन्नतीने पदस्थापना करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ. क्र	जे.सु. क्रमांक	सहाय्यक प्रशासकीय अधिकाऱ्यांचे नाव	पदोन्नतीने पदस्थापना
१	२	३	४
१	१	श्री. प्रशांत सुधाकरराव देशमुख	प्रशासकीय अधिकारी, विभागीय कृषि सहसंचालक कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक.
२	२	श्री. अदिनाथ दिनकरराव पवार	प्रशासकीय अधिकारी, कृषि आयुक्तालय, पुणे.
३	३	श्री. रविंद्र कोंडीबा काळे	प्रशासकीय अधिकारी, विभागीय कृषि सहसंचालक कार्यालय, कोकण विभाग, ठाणे.

२.   उपरोक्त तात्पुरती पदोन्नती खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे :-

1. मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या व प्रलंबित असलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील निर्णयास अधीन राहून आणि सा.प्र.वि./१६ब कार्यासनाच्या शासन निर्णय दि.०७.०५.२०२१ मधील तरतूदीनुसार पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या तसेच सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.०७.०५.२०२१ संदर्भात मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल असलेल्या न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून सदर तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

2. सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाची असल्यामुळे, या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी निवडसूचीतील अधिकाऱ्यांना नियमितपणाचा व सेवाज्येष्ठतेचा कोणताही हक्क मिळणार नाही.

3. संबंधित सहाय्यक प्रशासकीय अधिकारी यांनी महाराष्ट्र कृषि प्रशासकीय सेवा गट-अ (प्रशासकीय अधिकारी) या पदावरील तात्पुरती पदोन्नती नाकारल्यास सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३०३/का.१२, दि.१२.०९.२०१६, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही २०१८/प्र.क्र.१५९/का.१२, दि.०१.०८.२०१९ मधील तरतूदीनुसार संबंधित अधिकाऱ्यांचे नाव सन २०२५-२६ च्या निवडसूचीतून काढून टाकण्यात येईल आणि पुढील दोन वर्ष होणाऱ्या निवडसूचीमध्ये त्यांच्या नावाचा विचार न करता तिसऱ्या वर्षाच्या निवडसूचीत महाराष्ट्र कृषि प्रशासकीय सेवा गट-अ (प्रशासकीय अधिकारी) पदावरील तात्पुरत्या पदोन्नतीसाठी त्यांची पात्रता तपासण्यात येईल.

4. सदर सहायक प्रशासकीय अधिकारी यांची महाराष्ट्र कृषि प्रशासकीय सेवा गट-अ (प्रशासकीय अधिकारी) या संवर्गातील तात्पुरती पदोन्नती त्यांच्याविरुध्द प्रस्तुत आदेशाच्या दिनांकापर्यत कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी सुरु झालेली नाही वा प्रस्तावित नाही या धारणेच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

5. उपरोक्त सहायक प्रशासकीय अधिकारी यांनी सध्याच्या पदाचा पदभार विभागातील निकटतम ज्येष्ठ अधिकाऱ्यांकडे सोपवून तात्काळ पदोन्नतीच्या पदावर सा.प्र.वि. शासन अधिसूचना दि.२१.०६.२०२१ मधील तरतुदीनुसार आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसात रुजू होणे आवश्यक आहे.

6. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदरचे आदेश तात्काळ अंमलात आणुन, तसा अनुपालन अहवाल शासनास सादर करावा.

३.   सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८२५१७५२२३८४४६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

AMBADAS SAHEBRAO CHANDANSHIVE

Digitally signed by AMBADAS SAHEBRAO CHANDANSHIVE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agri and ADF Department,
2.5.4.20=8EC4809BF7E642CE22FDACB42A63CA8410ADE167476AC90F3C879FACBF715A09, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=462D06A8B0C3DF3A0B3C93FE66F4D8A55913CE3FEBB0F6CDDF9D398D85D7377C, cn=AMBADAS SAHEBRAO CHANDANSHIVE
Date: 2026.08.25 17:54:36 +05'30'

(अंबादास चंदनशिवे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे अप्पर मुख्य सचिव
२. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

३. मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परिक्षा) ½, महाराष्ट्र मुंबई / नागपूर.
८. सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे .
९. संचालक, वसंतराव नाईक कृषि व्यवस्थापन व प्रशिक्षण संस्था, (वनामती) नागपूर.
१०.उप सचिव (१२), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
११.संबंधीत विभागीय कृषि सह संचालक
१२.संबंधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी/उपविभागीय कृषि अधिकारी
१३.कृषि सह संचालक, (आस्थापना), कृषि आयुक्तालय, पुणे
१४.संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी
१५.सर्व संबंधित अधिकारी
१६.निवड नस्ती/१६-अे.